शनिवार
०५
सप्टेंबर २०२६

वर्ष १९ वे
अंक - २१६
पाने - ०६
किंमत - ०४ रूपये

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

# दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25






कुटे हॉस्पिटलच्या संचालिका
आणि प्रथितयश भूलतज्ज्ञ

## डॉ. सोनाली प्रदीप कुटे

यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा!



- शुभेच्छुक -

## कुटे हॉस्पिटल
ॲण्ड लॅप्रोस्कोपी सेंटर




सर्जरी विभाग :
अपघात विभाग :
सुपर स्पेशिलीटी विभाग :
अतिदक्षता विभाग :
डायलीसिस विभाग :
न्युरो विभाग :
हृदयरोग विभाग :
तपासणी व निदान

राज्य कर्मचारी
विमा योजना (ESIC)
विभाग नव्याने सुरू

GE IGS 320 OMEGA INNOVA
SPIN INDIA SKD
CATHLAB अहिल्यानगर
जिल्ह्यातील पहिलीच कॅथलॅब



हृदय विकार...अचूक निदान, योग्य उपचार, माफक दरात सर्वांसाठी....

- कंसल्टेशन
- ईसीजी
- २ डी इकोकार्डिओग्राफी
- बलून वॉल्वोटॉमी
- अँजिओग्राफी
- अँजिओप्लास्टी
- पेसमेकर
- डिव्हाईस क्लोजर
- स्ट्रेस टेस्ट
- होल्टर मॉनिटरींग
- आय व्ही सी फिल्टर
- अँब्युलेटरी बी.पी. मॉनिटरींग



• जटील व दुर्मिळ प्रक्रिया •

- सीटीओ अँजिओप्लास्टी
- बायफरकेशन अँजिओप्लास्टी
- लेफ्ट मेन अँजिओप्लास्टी
- रेट्रोग्रेड अँजिओप्लास्टी
- रोटा व आयव्हीयुएस मार्गदर्शित
- जटील अँजिओप्लास्टी

MPKAY ECHS CM RELIEF FUND

प्रधानमंत्री व महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत अँजिओग्राफी,
अँजिओप्लास्टी व निवडक शस्त्रक्रिया मोफत शस्त्रक्रिया केल्या जातील.*

सर्व मेडिक्लेम्स व कॅशलेस सुविधा उपलब्ध !

चौकशीसाठी संपर्क नं. : 888 888 2225
हृदयरोग विभाग संपर्क नं. : 888 837 2225
वैद्यकीय मदत (आण्णासाहेब थोरात) मॅनेजर : 888 873 2225

४० फुटी डि.पी. रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अहिल्यानगर फोन (०२४२५) २२६६८८,२२६६८६

पवित्र श्रावण मासारंभानिमित्त मंगलमय शुभेच्छा !
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवास अनेक, शाबुदाणा मात्र फक्त कॅमलचाच
1 kg | 500gm | 250gm
सर्व किराणा दुकानांमध्ये उपलब्ध

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काजळे ज्वेलर्स
सोने चांदी हिरे नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर



सिल्क फेस्टिव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा महोत्सव सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून राजेंद्र विश्वासाची सार्थ परंपरा...
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०, ७९०१० ३११५५.

# दिशा सालियन प्रकरणावर आदित्य ठाकरेंचा संताप

मुंबई (वृत्तसंस्था)

दिशा सालियन मृत्यू प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपविण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. याप्रकरणी बोलताना शिवसेना (उबाठा) नेते आदित्य ठाकरे यांनी सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियन यांच्या मृत्यूशी संबंध असल्याचे आरोप फेटाळून लावले. या आरोपांना का उत्तर द्यावे?, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. भाजपाने गेल्या सहा वर्षांपासून माझी बदनामी करण्याचा प्रयत्न केला, असा आरोपही आदित्य ठाकरेंनी गुरुवारी माध्यमांशी बोलताना केला.

दिशा सालियन मृत्यू प्रकरणाशी निगडीत प्रश्नावर पत्रकारांशी बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले की, याच्याशी माझा काहीही संबंध नाही आणि मी याचा विचारही केलेला नाही. मग मी यावर उत्तर का द्यावे? भाजपा प्रत्येकाची बदनामी करण्याचा प्रयत्न करतो. त्यांनी राहुल गांधींना अनेक वर्षांपासून पप्पू ठरवण्याचा प्रयत्न केला आहे. गेल्या सहा वर्षांपासून त्यांनी माझी बदनामी करण्याचा प्रयत्न केला आहे, असे आदित्य ठाकरे म्हणाले. माध्यमांशी बोलताना केला. भाजपाला जो कोणी त्यांच्या विरोधात बोलतो किंवा त्यांना खटकतो, त्याच्याशी त्यांना प्रॉब्लेम असते. मी म्हटल्याप्रमाणे, एखाद्या गोष्टीशी तुमचा काहीही संबंध नसेल तर त्यावर का बोलायचे किंवा त्याला महत्त्व का द्यायचे? हीच माझी भूमिका आहे, असे आदित्य ठाकरे पुढे म्हणाले.

# संगमनेर शहरातील वीजपुरवठा सुरळीत करा

## धोकादायक विद्युत यंत्रणा तातडीने दुरुस्त करा, नगरपरिषदेचे महावितरणला निवेदन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील विविध भागांमध्ये वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, अचानक फ्युज जाणे, डी.पी.वरून वीजपुरवठा बंद होणे तसेच जीर्ण व धोकादायक विद्युत यंत्रणेमुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर नगराध्यक्षा डॉ. मैथिली सत्यजीत तांबे यांनी महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देत शहरातील विद्युत व्यवस्थेची तातडीने पाहणी करून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.



इंदिरानगर, मालदाड रोड, पद्मानगर, अभंग मळा, जोर्वे रोड, कल्हेवाडी रोड, ज्ञानमाता विद्यालय परिसर, देवीगल्ली, रहेमतनगर, रंगारगल्ली, मदिनानगर, भारतनगर, अलकानगर यासह शहरातील अनेक भागांमध्ये वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विशेष म्हणजे अनेकदा पाणीपुरवठ्याच्या वेळेतच वीज गायब होत असल्याने नागरिकांना पाणी भरण्यासाठीही अडचणी निर्माण होत आहेत.

शहरातील काही भागांत विद्युत तारा खाली आलेल्या असून त्यांना मोठ्या प्रमाणात झोळ पडला आहे. अनेक ठिकाणी विद्युत खांब जीर्ण, वाकलेले व धोकादायक अवस्थेत आहेत. तसेच काही ठिकाणी घरांवरून अथवा घरांना अगदी लागून मुख्य विद्युत वाहिन्या गेल्याने नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे.

महावितरणने दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्याची वाट न पाहता प्रतिबंधात्मक कार्यवाही करावी, अशी भूमिका नगराध्यक्षा तांबे यांनी घेतली आहे. वारंवार वीज खंडित होणाऱ्या भागांची विशेष पथकाद्वारे पाहणी, संपूर्ण शहराचे तांत्रिक ऑडिट, धोकादायक तारा व खांबांचे सर्वेक्षण, जीर्ण खांब बदलणे, धोकादायक विद्युत वाहिन्या सुरक्षित अंतरावर हलविणे तसेच आवश्यक ठिकाणी नवीन खांब, केबल व फिडरची क्षमता वाढविण्याची मागणी करण्यात आली आहे.

शाळा, बाजारपेठा आणि दाट लोकवस्तीच्या परिसरातील विद्युत यंत्रणेची प्राधान्याने सुरक्षा तपासणी करण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. केवळ तात्पुरती दुरुस्ती न करता कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात आणि करण्यात आलेल्या कार्यवाहीचा लेखी अहवाल नगरपरिषदेस सादर करावा, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, येणाऱ्या उत्सव काळाच्या पार्श्वभूमीवर विद्युत यंत्रणेची विशेष तपासणी करून नागरिकांना सुरक्षित, सुरळीत आणि विश्वासार्ह वीजपुरवठा मिळण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अन्यथा वरिष्ठ स्तरावर प्रशासकीय पाठपुरावा करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. या निवेदनावर माजी नगराध्यक्ष सौ. दुर्गा सुधीर तांबे, दिलीप सहदेव पुंड, विश्वास रतन मुर्तडक यांच्यासह नगरसेवक गजेंद्र अभंग, किशोर पवार, नितीन अभंग, सौरभ कासार, दिवटे सोमेश्वर, भारत बोन्हाडे, सौ. प्राची काशीद, गणेश गुंजाळ तसेच सर्व नगरसेवकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# बिलवसुली फुल; मात्र वीजपुरवठा वारंवार गुल !

## घारगावकरांचा संताप; महावितरणच्या कारभाराविरोधात आंदोलनाचा इशारा



युवावार्ता (प्रतिनिधी)

घारगाव : महावितरणकडून वीजबिलांची वसुली नियमितपणे केली जात असताना दुसरीकडे घारगाव परिसरातील वीजपुरवठा मात्र वारंवार खंडित होत असल्याने नागरिकांसह व्यावसायिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. घारगाव येथील ३३/११ केव्ही उपकेंद्रामार्फत होणारा वीजपुरवठा अचानक बंद पडण्याचे प्रकार सातत्याने घडत असल्याने नागरिकांची दैनंदिन कामे अक्षरशः ठप्प होत आहेत.

घारगाव ही परिसरातील प्रमुख आणि मध्यवर्ती बाजारपेठ असल्याने शेजारील अनेक गावांमधून नागरिक बँकिंग, शैक्षणिक कामे, शासकीय कार्यालये, आरोग्य सेवा तसेच विविध खासगी कामांसाठी येथे येतात. मात्र कार्यालयीन वेळेत अचानक वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना तासन्तास गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

विशेषतः ऑनलाइन सेवा केंद्रे, झेरॉक्स, प्रिंटिंग, संगणकावर आधारित कामे, बँकिंग सेवा आणि अन्य व्यवसायांवर वीज खंडित होण्याचा थेट आर्थिक फटका बसत आहे. वीज नसल्याने ग्राहकांची कामे रखडतात आणि व्यावसायिकांचे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे 'वीज बिल वेळेवर भरायचे, मग वीजपुरवठा सुरळीत का नाही?' असा सवाल संतप्त ग्राहकांकडून उपस्थित केला जात आहे.

नियोजित दुरुस्ती अथवा देखभालीच्या कामांसाठी वीजपुरवठा बंद करावयाचा असल्यास महावितरणने संबंधित ग्राहकांना आगाऊ सूचना देणे आवश्यक आहे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अचानक वीज बंद करण्याऐवजी योग्य नियोजन करून कामे करण्यात यावीत, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे.

दरम्यान, शिवसेनेचे उपतालुकाप्रमुख संदीप आहेर यांनी वीजपुरवठ्याच्या या प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. घारगाव परिसरातील वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने ठोस उपाययोजना करावी. अन्यथा नागरिकांच्या प्रश्नासाठी आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा त्यांनी दिला. व्यावसायिक नीलेश कान्होरे यांनीही वारंवार होणाऱ्या वीजखंडितबाबत नाराजी व्यक्त केली. दुरुस्तीचे किंवा देखभालीचे काम असल्यास ग्राहकांना पूर्वसूचना देऊन त्याचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे. अचानक वीजपुरवठा खंडित झाल्याने व्यवसायाचे मोठे नुकसान होत असल्याचे त्यांनी सांगितले.

बिलवसुलीत कोणतीही कसूर न करणाऱ्या महावितरणने ग्राहकांना किमान सुरळीत आणि सातत्यपूर्ण वीजपुरवठा तरी द्यावा, अशी संतप्त भावना घारगाव परिसरातून व्यक्त होत आहे. आता महावितरण या समस्येची किती गांभीर्याने दखल घेते आणि वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी कोणती ठोस पावले उचलते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## हॉस्पिटलमध्ये आगीचा थरार !

# मोठा अनर्थ टळला!

छ.संभाजीनगर (वृत्तसंस्था)

छत्रपती संभाजीनगरमधून एक अतिशय खळबळजनक बातमी समोर आली आहे. शहरातील एशियन हॉस्पिटलमध्येभीषण आग लागल्याची घटना घडली आहे. आकाशवाणी चौकातील एशियन हॉस्पिटलमध्ये पहाटे पावणे तीनच्या सुमारास ही आग लागली असल्याची प्राथमिक माहिती आहे. दरम्यान, हॉस्पिटलच्या लहान मुलांच्या अतिदक्षता विभागात म्हणजेच NICUमध्ये आग लागल्याने एकच खळबळ उडाली असून आगीच्या वेळी NICUमध्ये ९ बालकं उपचार घेत होती. तर एसीच्या शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याची प्राथमिक माहिती आहे.

दरम्यान, आग लागल्याचं समजताच अग्निशमन दल, पोलीस आणि हॉस्पिटल कर्मचाऱ्यांनी तातडीने बचावकार्य सुरू केलं. सर्व ९ बालकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आलंय. सुदैवाने यात कुठलीही जीवितहानी झालेली नाही. तर यातील ५ बालकांना घाटी रुग्णालयात, ३ बालकांना एमजीएम रुग्णालयात, तर एका बालकाला संजीवनी हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आलंय. दरम्यान, आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या ५ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या.अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करत अवघ्या १० ते १५ मिनिटांत आगीवर नियंत्रण मिळवलं. यामुळे आग हॉस्पिटलच्या इतर भागात पसरण्याचा धोका टळला.महत्त्वाचं म्हणजे, ज्या पहिल्या मजल्यावर NICU आहे, तिथे एकूण ५८ रुग्ण उपचार घेत होते. यामध्ये ८ NICUतील बालकं, जनरल विभागातील ३६ आणि स्पेशल रूममधील १३ रुग्णांचा समावेश होता.

ADVANCE GOLD SIP SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
होलसेल बस्ता बांधा मस्त ऑफर मिळवा जबरदस्त !
बस्ता बांधायला यायचं हं!
FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग | डायरेक्ट फॅक्टरी ते ग्राहक
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

सोन्याच्या दागिन्यांची मजुरी फक्त 7%
मुदत फक्त 3 सप्टेंबरपर्यंत
PBM Jeweller's
श्रावण मास आणि रक्षाबंधन निमित्त
चांदी खरेदीवर 30% DISCOUNT
ऑफर फक्त 3 सप्टेंबरपर्यंत
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
अशोक चौक, गुंदेचा हॉस्पिटल समोर चावडी जवळ, संगमनेर
7599996999 / 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा


शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२४११०, २२५११०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com


संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफ्रुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे
डॉ. दिपाली पानसरे
उपलब्ध सुविधा
मेडिसिन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्यूरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# डॉ. सोनाली कुटे : संघर्षातून यशस्वी झालेल्या ‘झाशीच्या राणी’चा प्रेरणादायी जीवनप्रवास

वाढदिवस शुभेच्छा



वैद्यकीय क्षेत्रामध्ये अनेक डॉक्टर येतात आणि जातात; मात्र काही व्यक्तिमत्त्वे आपल्या कार्याने, सेवाभावाने आणि माणुसकीच्या स्पर्शाने समाजाच्या मनात कायमचे स्थान निर्माण करतात. अशाच प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांपैकी एक नाव म्हणजे डॉ. सोनाली प्रदीप कुटे. रुग्णसेवेला जीवनाचे ध्येय मानून, अत्याधुनिक आरोग्य सुविधा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा ध्यास घेऊन त्यांनी संगमनेर परिसरात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या जीवनप्रवासाकडे पाहताना जिद्द, संघर्ष, शिक्षण, कर्तव्यनिष्ठा आणि सेवाभावाचा सुंदर संगम अनुभवायला मिळतो. समाजसेवेच्या संस्कारातून घडलेले व्यक्तिमत्त्व.

डॉ. सोनाली कुटे यांचा जन्म नाशिक येथे ४ सप्टेंबर १९८५ रोजी झाला. सामाजिक जाणीव असलेल्या कुटुंबात त्यांचे बालपण गेले. घरातील संस्कार, समाजातील गरजू घटकांबद्दलची संवेदनशीलता आणि लोकांसाठी काहीतरी करण्याची प्रेरणा त्यांना लहानपणापासून मिळाली. बालपणापासूनच अभ्यासात हुशार असलेल्या सोनाली यांनी आपल्या आयुष्याचे ध्येय निश्चित केले होते. समाजासाठी उपयोगी ठरणारे क्षेत्र निवडायचे आणि त्यातून माणसांची सेवा करायची, ही भावना त्यांच्या मनात होती. याच विचारातून त्यांनी वैद्यकीय क्षेत्राची निवड केली.

**वैद्यकीय शिक्षणाचा कठीण पण यशस्वी प्रवास -**

डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी मोठी मेहनत घेतली. वैद्यकीय शिक्षण पूर्ण करताना अनेक आव्हानांचा सामना केला; मात्र जिद्द आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर त्यांनी यश मिळविले. त्यांनी एम.बी.बी.एस. शिक्षण पूर्ण केल्यानंतर भूलतज्ज्ञ या महत्त्वपूर्ण वैद्यकीय शाखेत विशेष प्राविण्य मिळविले. मुंबई येथील प्रतिष्ठित डखजछ मेडिकल कॉलेज मधून त्यांनी पुढील शिक्षण पूर्ण केले. वैद्यकीय ज्ञानासोबतच रुग्णांशी संवाद साधण्याची कला आणि त्यांच्याप्रती असलेली आपुलकी ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खास वैशिष्ट्ये ठरली.

कुटुंबाची साथ आणि सेवाव्रताची नवी सुरुवात - वैद्यकीय क्षेत्रातील वाटचालीदरम्यान त्यांचा विवाह डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे यांच्याशी झाला. दोघांनीही वैद्यकीय सेवेला सर्वोच्च स्थान देत समाजासाठी काहीतरी मोठे करण्याचा संकल्प केला. याच सेवाभावातून संगमनेर येथे कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर ची स्थापना करण्यात आली. सुरुवातीपासूनच या रुग्णालयाचे उद्दिष्ट केवळ उपचार करणे नव्हते, तर रुग्णांना विश्वास, आधार आणि उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे हे होते. आज कुटे हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा, तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन आणि अनुभवी वैद्यकीय कर्मचारी यांच्या माध्यमातून हजारो रुग्णांना लाभ मिळत आहे.

वैद्यकीय व्यवसाय सांभाळत असताना घरी कुटुंबाची जबाबदारी देखील तेवढ्याच क्षमतेने, आनंदाने सांभाळत आहेत. कुटुंबाचे सौंदर्य आणि सौहार्द कायम जपले. ज्येष्ठांची काळजी, मुलांना चांगले शिक्षण आणि चांगले संस्कार देण्यासाठी कायम पुढाकार घेतात.

**कोरोना काळातील देवदूतासारखी सेवा-**

२०२० मध्ये जगभर आलेल्या कोरोना महामारीच्या काळात आरोग्य क्षेत्रासमोर मोठे आव्हान निर्माण झाले होते. या कठीण परिस्थितीत अनेक जण घरी सुरक्षित राहण्याचा प्रयत्न करत असताना डॉक्टर, आरोग्य कर्मचारी मात्र जीव धोक्यात घालून रुग्णसेवा करत होते. या काळात डॉ. सोनाली कुटे यांनी आपल्या कर्तव्याला सर्वोच्च प्राधान्य दिले. रुग्णांना उपचार देणे, त्यांना मानसिक आधार देणे आणि त्यांच्या कुटुंबीयांना धीर देणे हे कार्य त्यांनी अविरतपणे केले. त्यांच्या या सेवाभावामुळे अनेक रुग्ण आणि कुटुंबांच्या मनात त्यांच्याबद्दल आदराची भावना निर्माण झाली.

**गरीब व गरजूंसाठी कायम मदतीचा हात-** डॉ. सोनाली कुटे यांची खरी ओळख त्यांच्या संवेदनशील मनात आहे. आर्थिक परिस्थितीमुळे उपचार घेणे कठीण असलेल्या अनेक रुग्णांना त्यांनी मदतीचा हात दिला आहे. आरोग्याबाबत जनजागृती करणे, महिलांच्या आरोग्याच्या प्रश्नांकडे लक्ष देणे आणि समाजातील दुर्लक्षित घटकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविणे यासाठी त्या नेहमी प्रयत्नशील असतात. त्यांच्यासाठी डॉक्टरकी हा केवळ व्यवसाय नसून एक सामाजिक जबाबदारी आहे. रुग्णांच्या चेहऱ्यावरचे समाधान हेच त्यांच्या कार्याचे खरे यश आहे.

**महिलांसाठी प्रेरणादायी आदर्श -**

एक महिला डॉक्टर, यशस्वी उद्योजिका, कुशल प्रशासक आणि संवेदनशील समाजसेविका म्हणून डॉ. सोनाली कुटे यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. कुटुंबाची जबाबदारी सांभाळत वैद्यकीय क्षेत्रात यशस्वी वाटचाल करणे आणि समाजासाठी वेळ देणे हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विशेष गुण आहेत. आज अनेक तरुणी आणि महिला त्यांच्याकडे प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून पाहतात.

**सेवेच्या वाटेवर अखंड प्रवास -** डॉ. सोनाली कुटे यांचा प्रवास हा केवळ एका डॉक्टरच्या यशाची कहाणी नाही, तर माणुसकी जपणाऱ्या एका संवेदनशील व्यक्तीचा प्रेरणादायी जीवनपट आहे. ज्ञान, मेहनत, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव यांच्या जोरावर त्यांनी आरोग्य क्षेत्रात विश्वासाचे स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त संगमनेर परिसरातील हजारो रुग्ण, मित्रपरिवार, सहकारी आणि शुभचिंतकांकडून त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या जात आहेत. आरोग्यसेवेच्या माध्यमातून समाजाच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणाऱ्या डॉ. सोनाली प्रदीप कुटे यांच्या हातून अशीच निरंतर सेवा घडत राहो, त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, यश आणि समाधान लाभो, हीच वाढदिवसानिमित्त सदिच्छा.

**- आण्णासाहेब थोरात**
**मॅनेजर, कुटे हॉस्पिटल, संगमनेर**

# पावसाळ्यात निमोनिया व डेंग्यूपासून बचावासाठी नागरिकांनी काळजी घ्यावी - डॉ. जगदीश वाबळे



संगमनेर : पावसाळ्याच्या दिवसांमध्ये वातावरणातील बदल, पाणी साचणे, डासांची वाढ तसेच संसर्गजन्य आजारांचे प्रमाण वाढते. यामध्ये निमोनिया आणि डेंग्यू यांसारख्या आजारांचा धोका वाढत असल्याने नागरिकांनी योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेर येथील डॉ. जगदीश वाबळे यांनी केले आहे.

निमोनिया हा फुफ्फुसांना होणारा संसर्ग असून त्यामध्ये ताप, खोकला, कफ, छातीत दुखणे, श्वास घेण्यास त्रास, अशक्तपणा अशी लक्षणे दिसू शकतात. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि प्रतिकारशक्ती कमी असलेल्या व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी. थंडी-पावसापासून संरक्षण करणे, स्वच्छता राखणे, पौष्टिक आहार घेणे आणि पुरेसे पाणी पिणे आवश्यक आहे. ताप व श्वास घेण्यास त्रास जाणवत असल्यास स्वतःहून औषधे न घेता डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

डेंग्यू हा एडिस डासाच्या चाव्यामुळे पसरणारा आजार आहे. घराच्या परिसरात किंवा घरातील भांडी, टाक्या, कुंड्या, टायर आदी ठिकाणी पाणी साचू देऊ नये. पाण्याची भांडी नियमितपणे स्वच्छ करून झाकून ठेवावीत. डासांपासून बचाव करण्यासाठी मच्छरदाणी, पूर्ण अंग झाकणारे कपडे आणि योग्य डास प्रतिबंधक उपायांचा वापर करावा.

डेंग्यूची प्रमुख लक्षणे म्हणजे अचानक येणारा ताप, डोकेदुखी, अंगदुखी, सांधेदुखी, डोळ्यांच्या मागे दुखणे, मळमळ तसेच काही वेळा त्वचेवर पुरळ येणे. ताप दोन-तीन दिवसांपेक्षा जास्त राहिल्यास किंवा रक्तस्राव, तीव्र पोटदुखी, सतत उलट्या, प्रचंड अशक्तपणा अशी लक्षणे दिसल्यास तातडीने वैद्यकीय तपासणी करणे गरजेचे आहे.

पावसाळ्यात घर आणि परिसर स्वच्छ ठेवणे, पाणी साचू न देणे, हात स्वच्छ धुणे, सुरक्षित पाणी व ताजा आहार घेणे आणि आजाराची लक्षणे दिसताच वेळेवर डॉक्टरांचा सल्ला घेणे हा आजारांपासून बचावाचा प्रभावी मार्ग आहे.

नागरिकांनी आरोग्याची कोणतीही लक्षणे दुर्लक्षित न करता वेळेवर तपासणी व उपचार करून घ्यावेत, असे आवाहन डॉ. जगदीश वाबळे, मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेर यांनी केले आहे.

# जैन समाजाचे ज्येष्ठ नेते चंदनमल बाफना यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील ज्येष्ठ व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते आणि जैन समाजाचे अग्रणी नेते चंदनमलजी बंडूलालजी बाफना (वय ८२) यांचे संथाराची पूर्णाहुती होऊन शुक्रवारी (दि. ४ सप्टेंबर) मध्यरात्री १२ वाजून ३२ मिनिटांनी निधन झाले. त्यांच्या निधनाने संगमनेरच्या व्यापारी, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक तसेच जैन समाजाच्या क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

चंदनमल बाफना यांनी आपल्या प्रदीर्घ सार्वजनिक जीवनात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान दिले. संगमनेर व्यापारी असोसिएशनचे माजी अध्यक्ष म्हणून त्यांनी प्रभावी काम केले. व्यापाऱ्यांचे प्रश्न, शहराच्या विकासाशी निगडित समस्या आणि मूलभूत सुविधांसाठी त्यांनी वेळोवेळी पुढाकार घेतला.

संगमनेर मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँकेचे माजी उपाध्यक्ष व संचालक म्हणूनही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. तसेच शिक्षण प्रसार संस्थेचे संचालक म्हणून शैक्षणिक क्षेत्रातही त्यांनी जबाबदारी पार पाडली. आनंदऋषी पतसंस्थेच्या उभारणी व जडणघडणीत त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. संगमनेरमध्ये दूरध्वनी सुविधा अपुरी असताना नागरिक व व्यापाऱ्यांच्या या ज्वलंत प्रश्नासाठी चंदनमल बाफना यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले होते. शहराच्या मूलभूत सुविधांसाठी आवाज उठविणारे आणि सार्वजनिक प्रश्नांवर ठाम भूमिका घेणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख होती. बाफना यांनी आपल्या व्यावसायिक कारकिर्दीची सुरुवात बाजारपेठेतील ‘बाफना मेडिकल’ या व्यवसायातून केली. प्रामाणिक व्यवहार, विश्वासार्हता आणि ग्राहकांशी जिव्हाळ्याचे संबंध यामुळे त्यांनी व्यापारी क्षेत्रात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले.

चंदनमल बाफना हे जैन समाजातील अग्रणी नेतृत्व म्हणून परिचित होते. जैन समाजाच्या जिल्हा संघटनेच्या उभारणी व विस्तारामध्ये त्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. समाजातील विविध धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांना त्यांनी वेळ, मार्गदर्शन तसेच आर्थिक सहकार्य केले. चंदनमल बाफना यांनी जीवनाच्या अंतिम टप्प्यात जैन धर्मपरंपरेतील संथारा स्वीकारला होता. संयम, आत्मशुद्धी आणि अध्यात्माचा मार्ग मानल्या जाणाऱ्या या साधनेची त्यांनी श्रद्धेने पूर्णाहुती केली. शुक्रवारी मध्यरात्री १२.३२ वाजता त्यांच्या संथाराची पूर्णाहुती झाली. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. दैनिक युवावार्ताच्या वतीने चंदनमल बाफना यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# चैतन्याचा उत्सव : भगवान श्रीकृष्ण



भगवान श्रीकृष्णांचा जन्म म्हणजे चैतन्याचा जन्म. मानवाला जीवन जगण्याचे मार्गदर्शन करण्यासाठी हा अवतार झाला. भगवान श्रीकृष्ण म्हणजे प्रेम, आनंद, चैतन्य आणि उत्साह. म्हणूनच त्यांच्या अवताराला प्रेमावतार किंवा आनंदावतार असेही म्हटले जाते. ‘अवतार’ म्हणजे मार्गदर्शन करण्यासाठी अवतरलेले रूप. स्वतःचे जीवन जगताना सुख-दुःखाचा स्वीकार कसा करावा, याचे उत्कृष्ट मार्गदर्शन भगवान श्रीकृष्णांनी मानवजातीला केले.

समस्त हिंदू समाजासाठी भगवान श्रीकृष्णांचा जन्म म्हणजे आनंदाची आणि उत्सवाची पर्वणी आहे. श्रीकृष्णतत्त्व प्राप्त करण्यासाठी दोन मार्ग सांगितले आहेत-ज्ञानमार्ग आणि भक्तिमार्ग.

ज्ञानमार्गामध्ये माणसाने ‘अहं’पासून ‘’पर्यंतचा प्रवास केला पाहिजे. ‘अहं’ माणसाला उन्मत्त बनवतो, तर ‘’ त्याला उन्नत बनवतो. भक्तिमार्गामध्ये ‘अभावा’पासून ‘अहोभावा’पर्यंत पोहोचले पाहिजे. भक्तीची सुरुवात अनेकदा मागण्यापासून होते. आपण भगवंताकडे सतत काही ना काही मागत राहतो आणि नकळत भिक्षुक बनतो. मात्र हळूहळू आपल्यातील क्षमता आणि सामर्थ्याची जाणीव होते. शेवटी आपण दाता बनतो. त्यानंतर भगवंताकडे मागण्यासाठी नव्हे, तर त्यांना भेटण्यासाठी जातो; स्वतःच्या आनंदासाठी जातो. यालाच ‘अहोभाव’ असे म्हणतात. भगवान श्रीकृष्णांनी ज्ञान आणि भक्ती या दोन्ही भावांचा सुंदर समन्वय घडवून आणला.

‘कृष्ण’ हा पूर्णावतार आहे. ‘कर्षती आकर्षती इति कृष्णः’-जो सर्वांना आपल्याकडे आकर्षित करून घेतो, तो कृष्ण. श्रीकृष्णांच्या सांगण्यावरून वर्षानुवर्षे चालत आलेली इंद्रपूजा थांबवून गोवर्धन पर्वताची पूजा सुरू करण्यात आली. यामागे केवळ धार्मिक बदल नव्हता, तर एक व्यापक संदेश होता. सत्ताधाऱ्यांची अंधपूजा करण्यापेक्षा ज्या निसर्गाने आपल्याला भरभरून दिले आहे, त्या निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करावी, हा संदेश श्रीकृष्णांनी दिला. निसर्गपूजेचा हा विचार संपूर्ण मानवजातीसाठी आजही तितकाच महत्त्वाचा आहे.

भगवान श्रीकृष्ण प्रत्येकाला आपापल्या भावनेनुसार अनुभवास आले. वृद्धांना ते मुलासारखे, युवकांना मित्रासारखे, राजांना राजासारखे आणि भक्तांना स्वयं भगवान वाटले. त्यांनी अधासुर, बकासुर यांसारख्या दांभिक व पापी शक्तींचा नाश केला. प्रभू श्रीरामचंद्र म्हणजे कौटुंबिक ऐक्य, तर भगवान श्रीकृष्ण म्हणजे सामाजिक ऐक्याचे प्रतीक. सामाजिक ऐक्य आणि धर्मरक्षण डोळ्यासमोर ठेवून त्यांनी खोट्या, दांभिक, स्वार्थी आणि भोगलंपट प्रवृत्तींना धडा शिकवला. कंस, दुर्योधन, कालयवन, नरकासुर, शिशुपाल, जरासंध अशा असुरी प्रवृत्तींच्या विरोधात त्यांनी धर्म आणि नीतीचे सुदर्शन चक्र हाती घेतले.

‘गोकुळ’ या शब्दाचाही एक सुंदर आध्यात्मिक अर्थ सांगितला जातो. ‘गो’ म्हणजे इंद्रिये आणि ‘कुळ’ म्हणजे समूह. म्हणजेच इंद्रियांचा समूह म्हणजे गोकुळ. या गोकुळातच भगवान श्रीकृष्णांचा जन्म झाला पाहिजे, म्हणजे आपल्या शरीररूपी गोकुळामध्ये कृष्णतत्त्वाचा जन्म झाला पाहिजे.

भगवान श्रीकृष्णांनी जगाला ज्ञान, भक्ती आणि कर्माचा संदेश दिला. तुला तुझे कर्म केलेच पाहिजे; तुझा उद्धार तुलाच करायचा आहे, हा त्यांच्या विचारांचा गाभा आहे. आकाशातून कोणी येईल आणि आपला उद्धार करेल, या समजुतीत माणसाने राहू नये. श्रीकृष्णांनी मानवाला प्रयत्नवाद शिकवला, अहंकाराचा त्याग करण्यास सांगितले आणि भक्तीचा मार्ग दाखवला.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे भगवद्गीतेच्या माध्यमातून त्यांनी संपूर्ण विश्वाला मानवतेचा संदेश दिला. मानवी जीवनातील अनेक प्रश्नांची उत्तरे गीतेत सापडतात. म्हणूनच भगवद्गीता केवळ संन्याशांसाठी नसून संसारात राहून जीवनातील संघर्षांना सामोरे जाणाऱ्या प्रत्येक माणसासाठी आहे. गीता म्हणजे शूरांचे गान आहे, सहज वाहणारी दुग्धधारा आहे. जीवनात दुःख, संकटे आली तरी त्यांना सामोरे कसे जायचे आणि सुख-दुःखात समत्व कसे साधायचे, हे भगवान श्रीकृष्णांनी गीतेतून सांगितले.

गीता मानवी जीवनाच्या भौतिक, राजकीय, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक अशा सर्वच क्षेत्रांना मार्गदर्शन करते. ज्ञान, कर्म आणि भक्ती यांचा समन्वय सांगताना श्रीकृष्णांचा संदेश अत्यंत सुंदर आहे-ज्ञानी माणसाचे डोके, कर्मयोग्याचे हात आणि भक्ताचे हृदय असावे. असा समन्वय साधणारा भक्तच भगवंताला प्रिय असतो.

आपण भगवान श्रीकृष्णांवर प्रेम करतो; मात्र हे प्रेम कसे असावे, हे नारद मुनींनी नारद भक्तिसूत्रात सांगितले आहे. ‘गुणरहितम्, कामनारहितम्, अविच्छिन्नम्, सूक्ष्मतरम्, अनुभवरूपम्’-भगवंतावरचे प्रेम कोणत्याही गुणाची अपेक्षा न ठेवता असावे. काही मागण्याची गरज नसावी; कारण त्याने आपल्याला सर्व काही दिले आहे, अशी भावना असावी. हे प्रेम केवळ संकटात किंवा दुःखातच नसावे, तर सुखात आणि आनंदातही तेवढेच असावे. हे प्रेम प्रत्येक क्षणी वाढत गेले पाहिजे आणि शेवटी त्याचा अनुभव आला पाहिजे.

म्हणूनच भगवान श्रीकृष्णांचे चरित्र आणि कृष्णतत्त्व समजून घेणे एवढे सोपे नाही. कृष्णभक्ती ही अत्यंत व्यापक आहे. ती वर्णनात्मक आहे, भावभक्ती आहे आणि त्याचबरोबर कृतीभक्तीही आहे. भगवान श्रीकृष्णांनी सांगितलेली भगवद्गीता प्रत्येक मानवापर्यंत, प्रत्येक घरापर्यंत आणि प्रत्येक झोपडीपर्यंत पोहोचवणे, हा कृतीभक्तीचा खरा मार्ग आहे.

‘कृष्णस्तु स्वयं भगवान’-कृष्ण हे स्वयं भगवान आहेत. त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा आपण सखोल अभ्यास केला पाहिजे. संपूर्ण विश्वाला मार्गदर्शन करणाऱ्या श्रीकृष्णांना म्हणूनच ‘कृष्णं वन्दे जगद्गुरुम्’ असे म्हटले जाते.भगवान श्रीकृष्णांच्या जन्मदिनानिमित्त हा शब्दप्रपंच!

**प्रा. शशांक गंधे**
**संगमनेर, जि. अहिल्यानगर**
**मोबा.९८९०१६३६४२**

# मेनरोडचे जागृत श्रीकृष्ण मंदिर नव्या रूपात सज्ज



युवावार्ता (प्रतिनिधी):

संगमनेर -शहरातील मेन रोड परिसरात भगवान श्रीकृष्णाचे एकमेव जागृत मंदिर आहे. या मंदिराच्या जागेवर महसुली नोंदीनुसार तेली समाजाचा उतारा असला, तरीही हे मंदिर समस्त हिंदू समाजाचे एक प्रमुख व जागृत श्रद्धास्थान मानले जाते.

संगमनेर ही एक ऐतिहासिक नगरी आहे. शहराच्या स्थापनेसोबतच विकसित झालेल्या मेनरोड, बाजारपेठ भागातील जागृत मंदिरांपैकी भगवान श्रीकृष्णाचे हे मंदिर एक आहे. सध्या या मंदिराचा जीर्णोद्धार अंतिम टप्प्यात आला आहे. मंदिराचे भव्य-दिव्य बांधकाम, कोरीव नक्षीकाम तसेच भगवान श्रीकृष्णाच्या विविध लीला रेखाटणाऱ्या प्रतिमांची नागरिकांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

मंदिराच्या जीर्णोद्धाराचे उर्वरित काम, संगमरवरी (मार्बल) फरशी बसवणे, रंगकाम आणि विद्युत रोषणाई (लाईट फिटिंग) यांसाठी भाविकांनी आर्थिक अथवा वस्तू स्वरूपात यथायोग्य देणगी द्यावी, असे आवाहन आज श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या पावन मुहूर्तावर मंदिर जीर्णोद्धार समितीचे ज्ञानेश्वर करपे यांनी केले आहे.

## प्रतिज्ञापत

मे. नोटरी साहेब, कार्यकारी दंडाधिकारी यांचेसमोर प्रतीआर टी ओ ऑफीस श्रीरामपूर यांचे कडेस या कामी सौ. रोहिणी धोंडीभाऊ वाघुले वय ४५ , धंदा घर काम रा. माहुली ता. संगमनेर जिः अहील्यानगर, सत्य प्रतिज्ञा पत्र करते की, वरील ठिकाणची रहिवासी असून आझा मुलगा प्रसाद धोंडीभाऊ वाघुले त्यांच्या नावावर महिंद्रा अँड महिंद्रा कंपनी बोलेरो पिकअप व्हॅन त्याचा रजिस्टेशन न-MH-17-CV 3273 त्याचा चॅसी नंबर MAIZN2TTKR6G 36249. इंजिन न TTR-4F 32754 असे असून त्याचे रनिट्रेशन RTO श्रीरामपूर येथे 29/10/2024 झालेले आहे. माझा मुलगा याने 24/10/2025 रोजी वरील नमुद वाहन हे माझ्या नावावर वारस या नात्याने होणेसाठी सदरचे प्रतिज्ञापत्र केले आहे.तसेच माझ्या मुलाचे माझ्या व्यतिरिक्त त्याचे वडील म्हणजे माझे पती हे धोंडीभाऊ सखमा वाघुले तसेच माझी मुलगी सौ. स्नेहल भारती गाडेकर व सौ निकिता राहुल निधाने त्यांच्याकडून माझ्या नावावर गाडी करण्यास कोणती हरकत नाही. तरी वरील नमूद पिकअप व्हॅन माझ्या नावावर ट्रान्स्फर करण्यासाठी सदरचे प्रतिज्ञा पत्र केले आहे. वरील मजकूर व माहिती खरी आहे. त्यामध्ये चुकीचे आढळून आल्यास मी भा. न्या. स. कलम 236-237 नुसार जबाबदार आहे याची मला जाणीव आहे.

**प्रतिज्ञापत्र - सौ. रोहिणी धोंडीबा वाघुले**

# शिस्त, संस्कारातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास : दुर्गाताई तांबे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील मालपाणी विद्यालयात जुलै-ऑगस्ट महिन्यात घेण्यात आलेल्या विविध शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्रके व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. मेजर ध्यानचंद जयंतीनिमित्त आयोजित क्रीडा सप्ताहाच्या समारोपानिमित्त दि. २ सप्टेंबर रोजी झालेल्या या बक्षीस वितरण समारंभात विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्याचे व यशाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

कार्यक्रमास माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, माजी क्रीडा शिक्षक सूर्यभान नवले, पालक प्रतिनिधी डॉ. मंगेश कडलग, अध्यक्षा सुवर्णाताई मालपाणी, सचिव सतीश लाहोटी, मुख्याध्यापक उत्तम एरंडे, पर्यवेक्षिका तथा क्रीडा शिक्षिका रंजना पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचा परिचय व सत्कार शकुंतला खरात यांनी केला. प्रास्ताविक रंजना पवार यांनी केले. दुर्गाताई तांबे यांनी शाळेतील शिस्त, संस्कार आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरणाचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी पालक व शिक्षकांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन केले. शिस्त, संस्कार आणि गुणवत्तेतूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडतो, असे त्यांनी सांगितले.

डॉ. मंगेश कडलग यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिक्षणासोबत कौशल्यविकास व जीवनमूल्यांना महत्त्व देण्याचे आवाहन केले. जिंकलो नाही म्हणून नम्र राहावे, हरलो तर हार मानू नये, या विचारातून त्यांनी विद्यार्थ्यांना जिद्द, प्रयत्न आणि आत्मविश्वासाचा संदेश दिला.

सूर्यभान नवले यांनी मालपाणी विद्यालयाची क्रीडा क्षेत्रातील उज्वल परंपरा कौतुकास्पद असल्याचे सांगितले. सुदृढ आरोग्यासाठी बळकट शरीर आवश्यक असून विद्यार्थ्यांनी विविध खेळांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षा सुवर्णाताई मालपाणी यांनी शिक्षकांची मेहनत व प्रामाणिक प्रयत्न हेच शाळेच्या गुणवत्तेचे रहस्य असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी विजयाचा आनंद घेताना पराभवातून शिकून सातत्याने प्रयत्नशील राहावे, असा संदेश त्यांनी दिला.

## संपादकीय...

## गुन्हेगारीच्या सावटाखाली सुरक्षिततेचा प्रश्न

गुन्हेगारी ही कोणत्याही समाजासाठी नवीन बाब नाही. मात्र, गुन्ह्यांचे स्वरूप बदलत जाणे, त्यातील हिंसकपणा वाढणे आणि गुन्हेगारीला मिळणारे सामाजिक धैर्य ही निश्चितच चिंतेची बाब आहे. चोरी, घरफोडी, मारामारी, खंडणी, महिलांवरील अत्याचार, बालकांविरुद्धचे गुन्हे, सायबर फसवणूक, अमली पदार्थांची विक्री अशा विविध घटनांची चर्चा रोजच्या जीवनाचा भाग बनत चालली आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांच्या मनात सुरक्षिततेबाबत प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी ब्युरोच्या २०२४ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात ३.८३ लाख गुन्हे नोंदवले गेले. त्याच वर्षी राज्यात हिंसक गुन्ह्यांची संख्या ८७,७९१ होती. ही आकडेवारी केवळ कागदावरील संख्या म्हणून पाहून चालणार नाही. प्रत्येक गुन्ह्यामागे एखाद्या व्यक्तीचे उद्ध्वस्त झालेले आयुष्य, कुटुंबाची असुरक्षितता आणि समाजातील वाढलेली भीती दडलेली असते. विशेषतः महिला आणि बालकांविरुद्धच्या गुन्ह्यांकडे पाहताना परिस्थिती अधिक गंभीर वाटते. छउठइ च्या २०२४ च्या अहवालानुसार महाराष्ट्रात बालकांविरुद्ध २४,१७१ गुन्हे नोंदवले गेले, जे देशातील सर्वाधिक होते. ही बाब समाज म्हणून आपल्याला अंतर्मुख करणारी आहे. मुलांना सुरक्षित वातावरण देण्याची जबाबदारी केवळ पोलिसांची किंवा सरकारची नाही; कुटुंब, शाळा, सामाजिक संस्था आणि संपूर्ण समाजाने ती स्वीकारली पाहिजे. गुन्हेगारी वाढण्यामागे अनेक कारणे आहेत. बेरोजगारी, व्यसनाधीनता, झटपट पैसा कमावण्याची मानसिकता, सोशल मीडियाचा गैरवापर, कौटुंबिक संघर्ष, गुन्हेगारी प्रवृत्तीला मिळणारे प्रोत्साहन आणि कायद्याची भीती कमी होणे ही त्यातील काही प्रमुख कारणे आहेत. सायबर युगात गुन्हेगारांनीही आपले तंत्र बदलले आहे. मोबाईलवर आलेल्या एका लिंकपासून ते बनावट गुंतवणूक योजनांपर्यंत नागरिकांची आर्थिक फसवणूक करण्याचे प्रकार वाढत आहेत. मात्र, गुन्हेगारीच्या प्रत्येक घटनेनंतर केवळ पोलिसांवर टीका करून प्रश्न सुटणार नाही. पोलिस यंत्रणेला आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षित मनुष्यबळ, पुरेसे वाहन व साधने आणि तपासासाठी आवश्यक पायाभूत सुविधा मिळणे गरजेचे आहे. महाराष्ट्राच्या उखऊ कडे राज्यातील गुन्हे व गुन्हेगारांची आकडेवारी संकलित करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा असून उउढछड सारख्या तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. या यंत्रणांचा अधिक प्रभावी वापर करून गुन्हे घडल्यानंतर तपास करण्याबरोबरच गुन्हे घडण्यापूर्वी त्यांचा अंदाज घेण्याची क्षमता वाढवणे आवश्यक आहे. कायदा-सुव्यवस्था ही राज्य सरकारची प्रमुख जबाबदारी आहे. त्यामुळे पोलिसांच्या कामगिरीचे नियमित मूल्यमापन, संवेदनशील भागात गस्त वाढविणे, सीसीटीव्ही यंत्रणा सक्षम करणे, महिला व बालकांसाठी तातडीच्या मदत यंत्रणा मजबूत करणे आणि गुन्हेगारांविरोधातील तपास व न्यायालयीन प्रक्रिया वेगाने होणे आवश्यक आहे. गुन्हा करूनही सहज सुटका होते, अशी भावना निर्माण झाली तर कायद्याचा धाक कमी होतो. याचबरोबर समाजाची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. गुन्हेगारी प्रवृत्ती दिसूनही 'आपल्याला काय करायचे?' अशी भूमिका घेणे धोकादायक आहे. संशयास्पद हालचाली, व्यसनांचा वाढता प्रसार, अल्पवयीन मुलांमध्ये वाढणारी हिंसक प्रवृत्ती किंवा महिलांवरील अत्याचार याकडे दुर्लक्ष न करता योग्य वेळी प्रशासनाला माहिती देणे गरजेचे आहे. गुन्हेगारी रोखण्यासाठी कठोर कायदे जितके आवश्यक आहेत, तितकेच संस्कार, शिक्षण, रोजगार आणि सामाजिक जबाबदारी आवश्यक आहे. शाळांमध्ये केवळ पाठ्यपुस्तकी शिक्षण न देता कायद्याचे भान, डिजिटल सुरक्षितता, व्यसनमुक्ती, स्त्री-सन्मान आणि मानवी मूल्यांचे शिक्षण दिले पाहिजे. कुटुंबात संवाद वाढला पाहिजे आणि मुलांच्या वर्तनातील बदल गांभीर्याने घेतले पाहिजेत. गुन्हेगारीचा आलेख हा केवळ पोलिसांच्या दप्तरी नोंदवलेल्या आकड्यांचा आलेख नाही; तो समाजाच्या आरोग्याचा आरसाही आहे. त्यामुळे आज गरज आहे ती गुन्हे घडल्यानंतर प्रतिक्रिया देण्यापेक्षा गुन्हेगारीची कारणे मुळापासून दूर करण्याची. कायद्याचा धाक, पोलिसांची तत्परता आणि समाजाची जागरूकता या तीनही गोष्टी एकत्र आल्या तरच सुरक्षित समाजाची निर्मिती शक्य आहे. अन्यथा गुन्हेगारीच्या वाढत्या सावलीत सामान्य नागरिकाचा सुरक्षित जगण्याचा अधिकारच प्रश्नांकित होत राहील.

याशिवाय गुन्हेगारी रोखण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी निश्चित होणे गरजेचे आहे. पालकांनी मुलांच्या वर्तनातील बदलांकडे गांभीर्याने लक्ष देणे, शाळा-महाविद्यालयांनी संस्कारांसोबतच कायदेविषयक आणि सायबर सुरक्षेचे शिक्षण देणे, तर नागरिकांनी संशयास्पद हालचालींची माहिती तत्काळ पोलिसांना देणे आवश्यक आहे. सोशल मीडियावर अफवा, द्वेषपूर्ण संदेश किंवा आक्षेपार्ह सामग्री पसरविण्यापासूनही प्रत्येकाने स्वतःला रोखले पाहिजे. पोलिस प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक संघटना आणि नागरिक यांच्यात समन्वय वाढला तर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभी राहू शकते. सुरक्षित समाज हा केवळ पोलिसांच्या कर्तव्याने नव्हे, तर सामूहिक जबाबदारीच्या जाणीवेतून घडतो.

## अकोले तालुक्यातील पहिले सर्जन डॉ. विजय पोपेरे यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - तालुक्यातील पहिले एमबीबीएस आणि एमएस (जनरल सर्जन) असलेले डॉ. विजय विठ्ठलराव पोपेरे (वय ५९, रा. बसस्थानक परिसर, अकोले, मूळ रा. कोंभाळने) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मुंबई येथील जसलोक रुग्णालयात उपचार सुरू असताना बुधवारी सायंकाळी पाच वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी अकोले येथील अमरधाममध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अकाली निधनामुळे सर्वत्र शोक व्यक्त केला जात आहे. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगी, दोन भाऊ आणि एक बहीण असा परिवार आहे. डॉ. विजय पोपेरे हे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य व सेवानिवृत्त मुख्याध्यापक स्व. विठ्ठलराव पोपेरे यांचे चिरंजीव होते. अकोले ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरेखा पोपेरे यांचे ते पती, तर डॉ. साक्षी पोपेरे यांचे वडील होत. तसेच नायर मेडिकल कॉलेजचे सेवानिवृत्त अधिष्ठाता डॉ. रमेश भारमाल-पोपेरे व पालघर येथील वेदांता मेडिकल कॉलेजचे अस्थिरोग विभागप्रमुख डॉ. संजय पोपेरे यांचे ते बंधू होत.

एक कुशल शल्यचिकित्सक, सेवाभावी डॉक्टर आणि प्रेमळ व्यक्तिमत्त्व म्हणून डॉ. विजय पोपेरे यांच्या आठवणी कायम स्मरणात राहतील. दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

## जाहीर नोटीस

मौजे संगमनेर बु।। ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथील ग. नं. २०४/१६६ खाता क्र. ८००८ सायराबानो हसन पठाण यांच्या मालकीचे क्षेत्र ०.००.७५ हे आर चौ. मी. आकार ०.०३ असे आहे इतर हक्कातील आदर्श ना. सह. पतसंस्था मर्या., संगमनेरची नोंद वर्षानूवर्षे राहिलेली आहे. याबाबत संगमनेर तहसीलमध्ये नोटीस क्र. कावि/आरटीएस/५६१/२०२६ सुनावणी सुरू आहे.

याबाबत कुणाला काही हरकत असेल तर संबंधीतांनी पुढील ७ दिवसात लेखी म्हणणे सादर करावे.

**सायराबानो हसन पठाण, संगमनेर**

## ग्रामपंचायत चांदगव्हाण, ता. कोपरगाव, जि. अ.नगर

मौजे चांदगव्हाण, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर, हे खाली नमुद केलेल्या कामासाठी नोंदणीकृत संस्था/नोंदणीकृत पुरवठादार / ठेकेदार यांचेकडून ब-१ निविदा मागवित आहेत. सदर निविदा ग्राम. कार्यालय मौजे चांदगव्हाण, ता. कोपरगाव, येथे कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० वा. ते सायं ५.०० वा. पर्यंत रुपये १००/- रोखीने भरून प्राप्त होतील. दि. ०५/९/२०२६ ते १०/०९/२०२६ पर्यंत सकाळी १० ते दु. ३ वा. पर्यंत प्राप्त झालेल्या निविदा दि. ११/०९/२०२६ रोजी सायं. ५.०० वा. ग्रा.पं. कार्यालयात शक्य झाल्यास हजर असणारे ठेकेदार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजना | अंदाजित रक्कम | निविदा फी | वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | सन २०२५-२६ मधील मौजे चांदगव्हाण येथे बंधिस्त गटार करणे ता. कोपरगाव | १५ वा वित्ता आयोग २०२५-२६ | २११८२८ | - | खुला |

अटी व शर्ती :- १. सविस्तर सुचना व माहिती ग्रामपंचायत चांदगव्हाण, ता. कोपरगाव येथे कार्यालयात पहावयास मिळतील. २. सदर कामाचे कोणतेही दरपत्रक अथवा नामंजुर करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे. तसेच अटीयुक्त दरपत्रक फेटाळण्यात येतील. याची नोंद घ्यावी.

ग्रामसेवक, ग्रा.पं. चांदगव्हाण, ता. कोपरगाव, जि. अ.नगर
सरपंच, ग्रा.पं. चांदगव्हाण, ता. कोपरगाव, जि. अ.नगर

## एल निनोचे सावट ! भारतात थंडी गायब होणार

मुंबई (वृत्तसंस्था)

हवामानातील सततच्या बदलांमुळे संपूर्ण जगासह भारताची चिंता वाढली आहे. प्रशांत महासागरात वेगाने वाढत असलेल्या तापमानामुळे आणि सक्रिय झालेल्या 'एल निनो' मुळे भारत पुढील सहा महिन्यांसाठी धोक्याच्या (डेंजर झोन) भागात गेला असल्याचा गंभीर इशारा संयुक्त राष्ट्र आणि जागतिक हवामान संघटनेने दिला आहे. या हवामान चक्रामुळे यंदाच्या वर्षी हिवाळ्याचा ऋतू जवळपास गायब होण्याची शक्यता असून, कडाक्याच्या थंडीचा अनुभव नागरिकांना मिळणार नाही.भारतामध्ये हिवाळा सुरू होण्यासाठी अवघे काही दिवस शिल्लक आहेत, परंतु यंदाची थंडी मागच्या वर्षांसारखी राहणार नाही. एल निनोच्या तीव्र प्रभावामुळे उत्तर आणि मध्य भारतात थंडी पडण्याची शक्यता अत्यंत रोडावली आहे. विशेषतः डिसेंबर आणि जानेवारी महिन्यात पडणारी कडाक्याची थंडी या उष्णतेच्या लाटेमुळे पूर्णपणे दबून जाऊ शकते. सुरुवातीला प्रचंड उन्हाळा, त्यानंतर मुसळधार पाऊस आणि आता पाऊस अचानक गायब होणे, यामुळे नागरिकांना यावर्षी हवामानाचे विविध आणि तीव्र रूप अनुभवावे लागले आहे.

भारतासारख्या कृषीप्रधान देशासाठी एल निनोचा हा प्रभाव अत्यंत चिंतेचा विषय आहे.


Yuvavarta.in
VISIT INSTAGRAM
daily_yuvavarta


**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME KAWADE PRAJAKTA BHASKARRAO (BOARD CERTIFICATE) (BEFORE NAME) TO NEW NAME AS PRAJAKTA BHASKAR KAWADE

AADHAR NO. 318222528623
PLACE - SANGAMNER
DATE - 05/09/2026

## Tender Notice

**"Sahyadri Bahujan Vidya Prasarak Samaj, Sangamner "**

At.- Sangamner, Tal.-Sangamner, Dist.- Ahilyanagar.

Sealed Tender in B-1 Forms are invited from all interested registered and experienced contractor's for the following work.

| Name of the work | Estimated cost (with GST) | Ernest Money | Time Limit | Cost of Blank Tender form |
|---|---|---|---|---|
| Computer Laboratory Furniture work of Building No.10 (Educational Building), 3rd Floor for Sahyadri Bahujan Vidya Prasarak Samaj's S.M.B.S.T. College, Sangamner. | 20,56,500.00/- Approximately | 20,565.00/- | 1 Months | 1000.00 |

Blank tender form are available at the office of **Arcvision|studio O , Top Ten Imperial, 3rd Floor, Shop T17, Nashik Road, Sangamner- 422605. (Mo No.9359314731)** from Date 04/09/2026 to 10/09/2026 at office hours except Sunday.

Sealed tender are accepted at the office of **Arcvision|studio O , Top Ten Imperial, 3rd Floor, Shop T17, Nashik Road, Sangamner- 422605,** on Date 11/09/2026 up to 04.00PM.

All rights are reserved with management.

**Chairman/Secretary**
Sahyadri Bahujan Vidhya Prasarak Samaj.
Sangamner.

**पाहिजेत**
सोनोग्राफी सेंटरसाठी मुलगी पाहिजे
कॉम्प्युटर व इंग्रजी टायपिंग येणे आवश्यक
(२ जागा त्वरीत भरणे आहे)
कामाची वेळ दु. १२ ते ८
संपर्क- जाधव सोनोग्राफी सेंटर
मर्चंट बँकेसमोर, नविन नगर रोड, संगमनेर
9307188862

**पाहिजेत**
सेल्समन
(महिला/ युवती प्राधान्य)
लिरा द कॉस्मेटिक्स झोन
वृंदावन अपार्टमेंट, गणेश नगर
मो. 7499630747

**जागा विकणे आहे**
अतिशय उत्तम लोकेशन मधील मालदाड रोड, स्टेट बँक कॉलनी लगतची तहसील N. A. व सरकारी मोजीणी झालेली २ गुंठे उत्तरमुखी रहिवाशी चौरस जागा विकणे आहे.
एजंट स्वागत
- संपर्क -
9890468212

**नोकरीची सुवर्णसंधी**
श्री गणेश टायर्स
अकाऊंटंट - १
टॅली, जीएसटी ज्ञानास प्राधान्य
सेल्स एक्झीक्युटिव्ह - १
बॅटरी व इंजिन ऑईलच्या विक्री क्षेत्रातील अनुभव
अनुभावानुसार आकर्षक पगार
पत्ता - तीन बत्ती चौक, संगमनेर
८९९९८६२७५९

**पाहिजेत**
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता
फक्त गरजुंनी संपर्क साधावा
पुरूष - ४ जागा
(वय- १८ ते ४०)
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण- जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे,२ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**पाहिजेत**
युवा ध्येय वृत्तपत्र संगमनेर कार्यालयासाठी अर्जंट पाहिजे
उपसंपादक - १ M
जाहिरात व्यवस्थापक - १ M
डिझायनर - १ M/F
टेलिकॉलर - १ M/F
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
७७६८०७९२७२,९३७०७७३५०४

**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त
०१ बीएचके
रो - हाऊस
भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

**JOB**

| Sr. No. | Post | QTY | Qualification and Experience |
|---|---|---|---|
| 1 | Security Guard | 5 | Experience Minimum 5 Year (Ex-Servicemen preferred) |
| 2 | Fitter/Welder/ Mechanical/ Electrical/ Refrigeration | 5 | ITI,DME or any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 3 | Data Operator/ Supervisor | 5 | Any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 4 | Chemist | 5 | B.Sc. Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |

Office Address-S.R.Thorat Milk Products Pvt.Ltd, Rajapur Road,Sangamner, Dist- Ahilyanagar
Mobile Number – 9860100936/937
Sent the CV Following E-Mail Id:
admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com




**बालाजी गॅस, संगमनेर पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर
(२ जागा, १ महिला, १ पुरूष)
योग्य पगार व इतर सवलती
- संपर्क -
8600828485
9370025610

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**कामासाठी मुले, मुली पाहिजेत**
अकाऊंटंट - १ (म.)
हेल्पर - १ (पु.)
सेल्समन - १ (पु./ म.)
कामाचा अनुभव आवश्यक
9422905155
9763232269

**पाहिजेत**
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
7588249849

# एआय तंत्रज्ञानाचा वापर करून उसाची उत्पादकता वाढवा - माजी मंत्री थोरात



युवावार्ता( प्रतिनिधी)-

संगमनेर- ऊस व दूध हे शाश्वत उत्पादन देणारे आहे. थोरात कारखान्याने कायम चांगला भाव दिला असून कार्यक्षेत्रामध्ये ऊस क्षेत्रवाढी बरोबर एकरी उत्पादन वाढले पाहिजे. नवीन एआय तंत्रज्ञानाचा वापर करू पिकांवरील समस्या व त्यावर उपाय करणे लवकर शक्य होणार आहे या तंत्रज्ञानाचा वापर करून उसाचे क्षेत्र व उत्पादकता वाढली पाहिजे यासाठी काम करावे असे आवाहन काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य माजी कृषीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले.

खांडगाव येथे कारखान्याच्या खांडेश्वर ऊस बेणे प्लॉट येथे कृत्रिम बुद्धिमत्ता व ऊस शेती याचबरोबर ऊस विकास मेळावा कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर कारखान्याचे व्हाईस चेअरमन पांडुरंग पाटील घुले, ॲड. माधवराव कानवडे, राज्य साखर संघाचे उपाध्यक्ष बाबा ओहोळ, संपतराव डोंगरे, लहान भाऊ गुंजाळ, इंद्रजीत थोरात, रामहरी कातोरे, रामदास वाघ, सभापती शंकरराव खेमनर, वसंतदादा शुगरचे शास्त्रज्ञ डॉ. अशोक कडलग, बारामतीचे तुषार पोळ, नितीन शिंदे, परिमल गिरी, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांच्यासह परिसरातील शेतकरी व ऊस उत्पादक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना मा कृषिमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, ऊस आणि दूध हे शेतकऱ्यांना शाश्वत उत्पादन देणारे आहे. शेती ही परवडणारी झाली पाहिजे याकरता उत्पादकता वाढवणे अत्यंत गरजेचे आहे. नवीन एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पिकांवरील समस्या आणि त्यावर करावयाचे उपाय याची तातडीने माहिती मिळत आहे त्यामुळे प्रभावी उपाययोजना लवकर करणे शक्य आहे. ठिबक सिंचन , एआय या प्रणालींचा वापर आपल्याला करावा लागणार आहे.

दुष्काळी भागाला वरदान ठरणारी निळवंडे धरण व कालवे आपण पूर्ण केले या दोन्ही कालव्यांमधून आता पाणी आले आहे त्या माध्यमातून उसाचे क्षेत्र वाढविले पाहिजे. कमी श्रमात जास्त उत्पादन हे सूत्र राबवताना शेती परवडणारी झाली पाहिजे. म्हणून शेती व्यवसाय म्हणून करा. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करा.

केंद्र सरकारने सहकारी साखर कारखान्यांना इथेनॉल निर्मिती करण्यास सांगितले मात्र आता ते इथेनॉल घेत नाहीत इथेनॉल घेणे ही त्यांची जबाबदारी आहे. मागील काही दिवसांमध्ये सरकारने देशातील साखर निर्यात केली आणि आता १० लाख टन साखर आयात केली आहे. निर्णयांमध्ये गोंधळ अशी परिस्थिती केंद्र सरकारची आहे आणि याचा तोटा सर्वसामान्य माणूस व शेतकऱ्यांना होत आहे.

कोणत्याही शेतकऱ्यांना ऊस लागवड करायची झाल्यास त्यांनी तीन महिने अगोदर कारखान्याला कळवल्यानंतर त्या शेतीचे आरोग्य कार्ड तयार केले जाते याचबरोबर उसाची उत्पादकता व क्षेत्र वाढल्याने कारखान्याचे कार्यक्षेत्रातील गाळप वाढणार आहे याचा फायदा थेट शेतकऱ्यांना चांगला भाव मिळण्यासाठी होणार आहे. या माध्यमातून वीज निर्मिती इथेनॉल उपपदार्थ निर्मितीमुळे शेतकऱ्यांना अधिक लाभ देता येईल असे ते म्हणाले.

तर डॉ. अशोक कडलग म्हणाले की, शेतीच्या समस्या लवकरात लवकर माहीत होऊन त्यावर त्वरित उपाय करण्यासाठी हे आहे तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे शेतीतील उत्पादकता वाढवण्यासाठी सेंद्रिय कर्ब वाढवावा लागेल यासाठी शेतकऱ्यांनी पाचटाचा खत म्हणून जास्त वापर करावा पाणी कमी वापरा माती परीक्षण करा असे त्यांनी सांगितले तर नितीन शिंदे म्हणाले की एआई तंत्रज्ञानामुळे तापमान आद्रता वाऱ्याचा वेग हवामान अंदाज शेतकऱ्यांना सहज कळतो.

## ए आय तंत्रज्ञान वापरासाठी २५ शेतकऱ्यांचा गट

**सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने संगमनेर तालुक्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता अंतर्गत ऊस विकास वाढ व्हावी याकरता २५ शेतकऱ्यांच्या शेतावर प्रयोग राबविण्यात आला आहे. दररोज हवामानातील होणारे बदल. संभाव्य येणारी कीड पाण्याची उपलब्धता याबाबतचे माहिती शेतकऱ्यांना मिळत असून या सर्व पंचवीस शेतकऱ्यांचा एक स्वतंत्र प्रयोग तत्त्वावर गट तयार करण्यात आला आहे. नवीन तंत्रज्ञानाचा हा वापर परवडणारी शेती करणारा करेल असा विश्वास माजी कृषी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केला तर या गट शेती मधून इतरांना प्रोत्साहन मिळेल असेही ते म्हणाले.**

# पठार भागाचे ज्येष्ठ नेते तुळशीनाथ भोर यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे माजी विश्वस्त, संगमनेर सुतगिरणीचे माजी चेअरमन, संगमनेर भाग शेतकी संघाचे संचालक तसेच सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक संस्थेचे माजी खजिनदार आणि पठार भागाचे सन्माननीय नेते तुळशीनाथ प्रभाकरराव भोर यांचे गुरुवार, दि. ३ सप्टेंबर २०२६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. ते समाजकारण, सहकार व शिक्षण क्षेत्रात कार्यरत राहून त्यांनी पठार भागाच्या विकासासाठी योगदान दिले.

त्यांच्या निधनाने पठार भागातील सामाजिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून, विविध क्षेत्रातील मान्यवरांसह ग्रामस्थांनी शोक व्यक्त केला.

त्यांच्यावर आंबी खालसा (ता. संगमनेर) येथे मुळा नदीतीरावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ, आप्तेष्ट व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

त्यांच्या पश्चात पत्नी सौ. मंदाकिनी तुळशीनाथ भोर, मुले वैभव व विक्रम तुळशीनाथ भोर, मुलगी सौ. वैशाली बाबासाहेब काळे, बंधू राजेंद्र प्रभाकरराव भोर व महेंद्र प्रभाकरराव भोर, तसेच सुना, नातवंडे असा परिवार आहे.

माळेगाव पठार, आंबी खालसा, पठार भाग पंचक्रोशीतील ग्रामस्थ तसेच भोर परिवारातील आप्तेष्टांनी त्यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले. दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# बिबट्याच्या सावटात देवगाव अंधारात

## वारंवार वीज खंडित होत असल्याने ग्रामस्थ त्रस्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

देवगाव - संगमनेर तालुक्यातील देवगाव परिसरात महावितरणच्या वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतकरी, व्यापारी आणि ग्रामस्थ हैराण झाले आहेत. विशेषतः सायंकाळी ६ ते रात्री ९ या वेळेत वीजपुरवठा बंद राहत असल्याने संपूर्ण गाव परिसरात अंधाराचे साम्राज्य पसरत आहे.

दिवसभरही विजेचा लंपडाव सुरूच असल्याने शेतीपंप, लघुउद्योग तसेच विविध व्यावसायिक कामांवर त्याचा मोठा परिणाम होत आहे. रात्रीच्या वेळी सलग तीन ते चार तास वीज गायब राहत असल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

देवगाव परिसरात सध्या बिबट्याचा वावर असल्याने रात्रीच्या अंधाराची समस्या अधिक गंभीर बनली आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर घराबाहेर पडणे, शेतात जाणे अथवा अत्यावश्यक कामासाठी रस्त्यावर येणेही ग्रामस्थांसाठी धोकादायक ठरत आहे. त्यामुळे बिबट्याचे सावट आणि त्यातच अंधार, अशा दुहेरी संकटात ग्रामस्थ सापडले आहेत.

वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये महावितरणच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त होत आहे. महावितरणने देवगाव परिसरातील वीजपुरवठ्याची तातडीने पाहणी करून तांत्रिक बिघाड दूर करावा आणि वीजपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

बिबट्याच्या वावरामुळे आधीच नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असताना रात्रीच्या वेळी होणारा वीजपुरवठ्याचा लंपडाव थांबवून ग्रामस्थांना सुरक्षिततेचा दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# आ. खताळ यांना धमकी देणाऱ्या प्रसाद गुंजाळवर गुन्हा दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आमदार अमोल खताळ यांच्यावर मागील रागातून हल्ला करण्याच्या तयारीत असल्याचे पाहून हटकल्याने प्रसाद गुंजाळ याने आपल्याला शिवीगाळ केली. तसेच आपल्यावर हल्ला केला. अशी फिर्याद संदेश बाळासाहेब देशमुख रा. राजापूर यांनी शहर पोलिस ठाण्यात दिली. यावरून पोलिसांनी प्रसाद आप्पासाहेब गुंजाळ रा. खांडगाव याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

तिसऱ्या श्रावणी सोमवारी खांडेश्वर मंदिर परिसर भाविकांच्या गर्दीने गजबजलेला असताना आमदार खताळ यांच्यावर हल्ला करण्याच्या संशयावरून प्रसाद आप्पासाहेब गुंजाळ या तरुणाला आमदार समर्थकांनी पकडून मारहाण केली होती. या प्रकारामुळे मंदिर परिसरात काही काळ मोठा गोंधळ निर्माण झाला. या प्रकरणी गुंजाळ यांच्या फिर्यादीवरून देशमुख व इतर कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर आज देशमुख यांच्या फिर्यादीवरून गुंजाळ यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आमदार अमोल खताळ हे खांडेश्वर मंदिरात येणार असल्याची पूर्वकल्पना संबंधित तरुणाला असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे, गेल्या काही दिवसांपासून गुंजाळ हा आपल्या सोशल मीडिया खात्यावरून सूचक स्वरूपाचे संदेश देत असल्याची चर्चा आहे.तिसरा श्रावणी सोमवार असल्याने याचवेळी संशयित गुंजाळ मंदिर परिसरात वावरत असल्याचे आमदार समर्थकांच्या निदर्शनास आले. याबाबत गुंजाळ याला हटकले असता गुंजाळ याने देशमुख यांच्या कानाखाली मारली तसेच आ. खताळ यांना देखील धमकी दिली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे भाविकांमध्येही काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. मंदिर परिसरात बंदोबस्तासाठी उपस्थित असलेले शहर पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्यासह पोलिस कर्मचाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत गुंजाळ याला ताब्यात घेतले. दरम्यान, २८ ऑगस्ट रोजी वर्षभरापूर्वी संगमनेर फेस्टिव्हलच्या उद्घाटन सोहळ्यात मालपाणी लॉन्स येथे उपस्थित असलेल्या आमदार अमोल खताळ यांच्यावर प्रसाद गुंजाळ याने हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी उपस्थित नागरिकांनी गुंजाळ याला पकडून दिले होते.

# सणांच्या अन्नावर FDA चा पहारा

मुंबई (वृत्तसंस्था)

सण-उत्सवांच्या काळात भाविक आणि नागरिकांना मिळणारा महाप्रसाद, लंगर अथवा भंडाऱ्यांमधील अन्नाची गुणवत्ता आता अन्न आणि औषध प्रशासनाच्या थेट रडारवर असणार आहे. अन्न आणि औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सण-उत्सवांच्या काळात होणारी अन्नातील भेसळ रोखण्यासाठी 'स्टँडिंग ऑर्डर्स फॉर ऑल फेस्टिव्हल्स' हा ऐतिहासिक आणि धर्मनिरपेक्ष निर्णय जाहीर केला आहे. या नियमानुसार, महाप्रसादाच्या ठिकाणांची प्रत्यक्ष तपासणी केली जाईल. भारताच्या इतिहासात सर्व धर्मीयांच्या सणांसाठी वर्षभराचा असा स्थायी आदेश काढण्याची ही पहिलीच वेळ आहे.


संगमनेर शहर पोलीस स्टेशन
सहाय्यक फौजदार



मा.श्री. राजेश एकनाथ जगधने
यांना
वाढदिवसानिमित्त
मनःपूर्वक शुभेच्छा !
***
दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता


# विखे पाटलांच्या राजीनाम्याची मराठा समाजाची मागणी

जालना (वृत्तसंस्था)

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचा आज सातवा दिवस आहे. या सात दिवसात अद्याप कोणताच ठोस तोडगा निघालेला नाहीये. त्यामुळे मराठा आंदोलक चांगलेच आक्रमक झाले आहेत. जरांगे यांच्या समर्थनासाठी आंदोलकांनी रास्तारोको, निदर्शने, आंदोलने सुरू केली आहेत. तसेच अनेक जिल्ह्यात बंदही पुकारला आहे. त्यातच आता मराठा समाजाने सर्वात मोठी मागणी केली आहे. राधाकृष्ण विखे पाटील यांनीच्या मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा. त्यांनी राजीनामा दिला नाही तर मुख्यमंत्र्यांनी त्यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी केली आहे. त्यासाठी आंदोलकांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मनधरणी केली आहे.सकल मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक करण गायकर यांनी पत्रकार परिषद घेऊन ही मागणी केली आहे. तसेच राधाकृष्ण विखे पाटील यांचा खोटारडेपणाही चव्हाट्यावर आणला आहे. मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील मराठा समाजाची दिशाभूल करत आहेत. आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, सारथी, मराठा विद्यार्थ्यांचे वसतिगृह, डउइउ आरक्षणाबाबत विखे पाटील यांनी एकही बैठक घेतली नाही. मराठा समाजाशी ते बोलत नाहीत. बैठक घेत नाहीत. समाजासाठी काय करत आहात, ते देखील सांगत नाहीत.

त्यामुळे समाजाची दिशाभूल करणाऱ्या राधाकृष्ण विखे पाटील यांनी अध्यक्ष पदाचा राजीनामा द्यावा. ते राजीनामा देत नसतील तर मुख्यमंत्र्यांनी तो घ्यावा, अशी मागणी करण गायकर यांनी केली आहे.डउइउ आरक्षण टिकवण्यासाठी देखील काही केलं जात नाहीये, असा दावा करतानाच येत्या ८ तारखेला मुंबईत मराठा समाजाची बैठक घेऊन आंदोलनाची पुढील दिशा ठरवणार असल्याचं त्यांनी सांगितलं. जरांगे पाटील आणि आमचा लढा एकच आहे.


नोकरीची सुवर्णसंधी

'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'

(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे

पदे: Field Sales Executive
Business Development Manager

कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग

पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक

सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा

संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165



चैतन्य हॉस्पिटल

डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)

सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध

- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)

02425 - 224761, मोबा. 7038170382





दर्शन टेक्सटाईल मार्केट

तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स

30% ते 70% डिस्काउंट सेल

सेल नव्हे होलसेल सेल

मान्सून ऑफर

टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस ब्लेझर | जाकेट

संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605



सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी



आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज

SMBT BANK

बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.

* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे

सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा

- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड , तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता



मार्स युनिव्हर्स
प्रायव्हेट लिमिटेड

टूर्स, ट्रॅव्हल्स आणि कॉर्पोरेट सर्व्हिसेस

तुमचे पाऊल मंगळावर ठेवण्यासाठी मार्स युनिव्हर्स सज्ज



प्रति व्यक्ती 59,000/-* (फुकेत, बँकॉक)

प्रति व्यक्ती 79,000/-* (व्हिएतनाम, सिंगापूर, बाली)

आंतरराष्ट्रीय टूर पॅकेजेस | कॉर्पोरेट इव्हेंट मॅनेजमेंट | मिटींग्स, इन्सेंटिव्ह टूर्स | विश्वसनीय सेवा उत्तम नियोजन

1 ला ग्रुप - 26 सप्टेंबर
2 रा ग्रुप - 1 ऑक्टोबर
3 रा ग्रुप - 10 ऑक्टोबर

संपर्क - किशोर सोनवणे 9309429705

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९६६६०४
७६२०३८८२३०



श्री महाकालेश्वराचे अलौकिक दर्शन!
श्रावण मासानिमित्त भक्ती शक्ती मंदिरात, उज्जैनच्या
श्री महाकालेश्वराचा प्रतिरूपाचे दर्शनाचा लाभ घ्यावा.
श्रावण मासारंभ निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
भक्ती शक्ती मंदिर
डेरे फाउंडेशन कॅम्पस, कऱ्हे फाटा, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर

# ज्ञानदानातून समाज प्रबोधनाचा ध्यास; कृतीशील शिक्षकांच्या कार्याला शिक्षक दिनी सलाम !

## सेवा, संघर्ष आणि संवेदनशीलतेतून नेतृत्वाची उंची गाठलेले व्यक्तिमत्त्व : आर. पी. राहणे

काही माणसे पदामुळे मोठी होत नाहीत; उलट आपल्या कर्तृत्वाने, संघर्षशील वृत्तीने आणि माणुसकीच्या जाणिवेने पदाला मोठेपण देतात. शिक्षकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठविणारे, अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहणारे आणि सर्वसामान्य शिक्षकांच्या सुख-दुःखाशी आपलेपणाने जोडलेले आर. पी. राहणे सर हे अशाच बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे उदाहरण आहे.

शिक्षकांच्या प्रश्नांसाठी प्रशासनाशी संघर्ष करण्याची तयारी, योग्य प्रश्नासाठी पदाधिकाऱ्यांनाही जाब विचारण्याचे धाडस आणि सामान्य शिक्षकाला न्याय मिळवून देण्याची तळमळ ही त्यांच्या कार्याची ठळक वैशिष्ट्ये आहेत. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या (संभाजी थोरात-पाटील गट) राज्य प्रतिनिधी म्हणून ते शिक्षकांच्या व्यापक प्रश्नांसाठी सातत्याने कार्यरत आहेत. त्यांच्या दृष्टीने संघटन म्हणजे केवळ पद नव्हे, तर प्रत्येक कार्यकर्त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे होय.



कोरोना महामारीचा काळ त्यांच्या सेवाभावी वृत्तीची खरी कसोटी ठरला. संगमनेरमधील प्राथमिक शिक्षकांच्या सहकार्याने सिंधू लॉन्स येथे उभारण्यात आलेल्या कोविड सेंटरमध्ये त्यांनी जीवाची पर्वा न करता अहोरात्र सेवा बजावली. रुग्णांची काळजी घेणे, त्यांना धीर देणे, आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन करणे, या जबाबदाऱ्या त्यांनी अत्यंत आपुलकीने पार पाडल्या. त्यांच्या या सेवेतून शिक्षकांच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले.

सध्या हिवरगाव पावसा शाळेचे मुख्याध्यापक म्हणूनही त्यांची कार्यशैली प्रेरणादायी ठरत आहे. लोकसहभागातून लाखो रुपयांच्या शैक्षणिक साधनसामग्री व सुविधांची उभारणी करून शाळेचा सर्वांगीण विकास साधण्याचा त्यांनी ध्यास घेतला आहे. पालक, ग्रामस्थ आणि पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन जालिंदरनगर येथील आदर्श शाळेचा अनुभव प्रत्यक्ष दाखवत आपल्या शाळेलाही त्याच धर्तीवर विकसित करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत.

शिक्षक नेता, मुख्याध्यापक, उत्कृष्ट संघटक आणि समाजभान जपणारा सेवेकरी अशा विविध भूमिका ते समर्पणाने निभावत आहेत. अन्यायाविरुद्धचा आक्रमकपणा आणि माणसांविषयीची करुणा यांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसतो.

शिक्षक दिनानिमित्त त्यांच्या कार्याला मनःपूर्वक सलाम! त्यांच्या नेतृत्वातून शिक्षक संघटनेला नवी ऊर्जा, दिशा आणि विश्वास मिळत राहो आणि शिक्षण, शिक्षकहित व समाजसेवेचे हे कार्य अखंड सुरू राहो, हीच मनःपूर्वक सदिच्छा!

**अशोक शेटे, खांडगाव**
**मो. ९९२११६९२८६**

## नकारात्मकतेकडून सकारात्मकतेकडे... जिद्दीच्या वाटेवरचा प्रेरणादायी प्रवास - दीपाली रेपाळ

कमी पटाची शाळा म्हणजे कमी संधी नव्हे; तर आपल्या कर्तृत्वाला सिद्ध करण्याचे मोठे आव्हान असते! या विचाराचा प्रत्यय आपल्या सातत्यपूर्ण कार्यातून देणाऱ्या श्रीमती दीपाली रेपाळ मॅडम यांना यंदाचा जिल्हा शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार केवळ एका शिक्षिकेचा सन्मान नसून, त्यांच्या जिद्दीचा, सकारात्मक दृष्टिकोनाचा, नाविन्यपूर्ण शैक्षणिक कार्याचा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेल्या अथक परिश्रमांचा गौरव आहे.



मोठ्या पटाच्या शाळेतून एकशिक्षकी व कमी पटाच्या शाळेत बदली झाल्यानंतर अनेकांसाठी ही परिस्थिती निराशाजनक ठरली असती. मात्र, रेपाळ मॅडम यांनी परिस्थितीला दोष देण्याऐवजी 'उपलब्ध साधनांमध्येही गुणवत्तापूर्ण शिक्षण देता येते', हा विश्वास मनाशी बाळगला. गेल्या सात-आठ वर्षांपासून त्यांनी उत्साह, निष्ठा आणि सकारात्मक ऊर्जेने काम करत शाळेच्या शैक्षणिक व भौतिक प्रगतीला चालना दिली.

विशेष म्हणजे, आपल्या कार्याची फाईल त्यांनी यापूर्वीही पुरस्कारासाठी सादर केली होती; मात्र त्या वेळी पुरस्कार मिळाला नाही. परंतु सन्मान न मिळाल्याने खचून जाणे त्यांच्या स्वभावातच नव्हते. उलट, अपयशाला त्यांनी पुढील यशाची प्रेरणा बनविले. अधिक जोमाने, अधिक नियोजनबद्ध पद्धतीने आणि गुणवत्तेचा ध्यास घेत त्यांनी आपली कार्याची वाटचाल सुरू ठेवली. अखेर त्यांच्या सातत्यपूर्ण आणि उल्लेखनीय शैक्षणिक कार्याची दखल घेत संगमनेर तालुक्यातून जिल्हा शिक्षक पुरस्कारासाठी त्यांची निवड झाली. त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य म्हणजे उपक्रमशीलता आणि लोकसहभागातून शाळा विकासाची संकल्पना प्रत्यक्षात आणणे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, शैक्षणिक उपक्रम, जिज्ञासा, सर्जनशीलता व आत्मविश्वास निर्माण करणे, उपलब्ध साधनसामग्रीचा प्रभावी वापर करणे, तसेच गुणवत्तावाढीसाठी सातत्याने प्रयत्न करणे, यावर त्यांचा विशेष भर राहिला.

शाळेतील परसबाग, लोकसहभाग, विविध शैक्षणिक उपक्रम आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षणपद्धती यामुळे शाळेच्या विकासाला सकारात्मक दिशा मिळाली. केवळ वर्गातील अध्यापनापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध संधी उपलब्ध करून देण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. सध्या रेपाळ मॅडम संगमनेर तालुक्यातील जाखुरी शाळेच्या मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. तेथेही त्यांची गुणवत्तापूर्ण व उपक्रमशील कार्याची वाटचाल अविरत सुरू आहे. 'शाळा ही केवळ इमारत नसून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याची कार्यशाळा आहे,' या भावनेतून त्या शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील आहेत. दीपाली रेपाळ मॅडम यांना मिळालेला जिल्हा शिक्षक पुरस्कार म्हणजे त्यांच्या प्रामाणिकपणाची, सातत्याची, जिद्दीची, सकारात्मकतेची आणि शैक्षणिक बांधिलकीची पावती आहे. प्रतिकूल परिस्थितीतही संधी शोधून उत्कृष्ट कार्य करता येते, हा प्रेरणादायी संदेश त्यांच्या प्रवासातून मिळतो.

या पुरस्काराबद्दल श्रीमती दीपाली रेपाळ मॅडम यांचे मनःपूर्वक अभिनंदन! त्यांच्या ज्ञानदानाची, उपक्रमशीलतेची आणि प्रेरणादायी कार्याची वाटचाल अशीच अविरत सुरू राहो आणि त्यांच्या प्रयत्नांतून असंख्य विद्यार्थ्यांचे भविष्य अधिक उज्ज्वल होवो, ही मनःपूर्वक शुभेच्छा!

**अशोक शेटे, खांडगाव**
**मो. ९९२११६९२८६**

## विद्यार्थी घडवणारा शिल्पकार: शिक्षक

अज्ञानाच्या अंधारातून प्रकाशाकडे नेणारा,
बालमनावर संस्कारांचे सुंदर रोपटे लावणारा...
मातीचा गोळा, त्याला देई सुरेख आकार,
विद्यार्थी घडवणारा तोच खरा शिल्पकार!

शिक्षक हा केवळ वर्गात पुस्तके शिकवणारा घटक नसून, तो एका सशक्त पिढीचा आणि पर्यायाने राष्ट्राचा पाया रचणारा खरा शिल्पकार असतो. दगडामधून देखणी मूर्ती घडवताना मूर्तिकाराला जसे अपार कष्ट घ्यावे लागतात, तसाच कुंभारकाम किंवा शिल्पकलेसारखा हा अत्यंत नाजूक, स्नेहाचा आणि जबाबदारीचा प्रवास असतो. एका अनघड, साध्या बालकाला ज्ञानाची तेजस्वी प्रभा देऊन त्याला समाजात ताठ मानेने जगण्यास सक्षम बनवण्याचे महान कार्य शिक्षक करत असतात.



**सावंत निता शिवाजी**
**जि. प. प्रा. शाळा धांदरफळ खुर्द ता. संगमनेर**
**शिक्षण– HSC D. Ed, BA, MA, DSM, MA Education, B.Ed appear**

**सेवा– २० वर्षे शैक्षणिक वाटचालीस अतिशय प्रामाणिकपणे काम करत विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुधारण्यासाठी वेगवेगळ्या अध्यापन पद्धती, साहित्य, सांस्कृतिक, क्रीडा स्पर्धेत विद्यार्थी यशस्वी होण्यासाठी प्रयत्न. उपक्रमशील शिक्षक म्हणून अनेक पुरस्कार.**

वर्गातील संवाद आणि जिव्हाळा

वर्गात जेव्हा शिक्षक नवनवीन खेळ, प्रश्नमंजुषा, चर्चासत्रे आणि रंजक पद्धतींचा वापर करून शिकवू लागतात, तेव्हा वर्ग केवळ अभ्यासाची जागा राहत नाही, तर तिथे आनंदाची कारंजी फुलतात. विद्यार्थी जेव्हा अडखळतात आणि शिक्षक त्यांना प्रेमाने मार्ग दाखवतात, तेव्हा त्यांच्यातील हा सुसंवाद असा उमटतो:

विद्यार्थी: सर, मला हे जमत नाही, भीती
वाटते मनास...
शिक्षक: घाबरू नकोस बाळा, धर माझ्या
हातास, चुकांमधूनच शिकूया आपण, गाठूया
आकाशास!

शिक्षकाच्या नजरेत सर्व विद्यार्थी आणि त्यांचे पालक समान असतात. हुशार विद्यार्थ्यांच्या कौतुकासोबतच अभ्यासात मागे पडणाऱ्या मुलांच्या पाठीवर मायेचा हात ठेवून, त्यांच्यातील न्यूनगंड काढून टाकण्यासाठी शिक्षक दिवस-रात्र मेहनत घेतात.

शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे अतूट नाते

शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे नाते हे केवळ गुरु-शिष्याचे नसून ते विश्वासाचे आणि स्नेहाचे एक रेशमी बंधन असते.

गुरु-शिष्यांचे सुंदर नाते
शिष्याच्या पंखांना बळ देई,
पाठीवरती मायेचा हात...
कठीण असो कितीही वाट,
शिक्षक देती अखंड साथ!
यशाचा जेव्हा होतो जयजयकार,
शिष्याचा माथा उंचावतो...
तेव्हा खऱ्या अर्थाने हा शिल्पकार,
मनातल्या मनात हरखून जातो!

सच्चा मार्गदर्शक आणि दीपस्तंभ

शिक्षक हा मुलांच्या आयुष्यातील असा दीपस्तंभ आहे, जो स्वतः जळून इतरांच्या आयुष्यात ज्ञानाचा प्रकाश पसरवतो. आपल्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्याने यशाचे सर्वोच्च शिखर गाठावे आणि एक उत्तम नागरिक म्हणून नावारूपाला यावे, हीच एकमेव आस शिक्षकाच्या मनात असते.

शिक्षक दिनाच्या या पवित्र प्रसंगी, आपल्या ज्ञानाच्या अमूल्य शिदोरीने विद्यार्थ्यांचे आयुष्य उजळणाऱ्या अशा सर्व आदरणीय शिक्षकांना कोटी कोटी प्रणाम!

## शिक्षक ते समाजशिक्षक... संजय जेडगुले यांचा प्रेरणादायी सेवाप्रवास

शिक्षण हे केवळ ज्ञानदानाचे माध्यम नसून विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देत समाज घडविण्याचे प्रभावी साधन आहे, या विचाराला कृतीची जोड देत गेली १८ वर्षे विद्यार्थी, शाळा आणि समाजासाठी समर्पितपणे कार्य करणारे सह्याद्री प्राथमिक विद्या मंदिर, संगमनेरचे सहशिक्षक श्री. संजय राजाराम जेडगुले यांचा सेवाप्रवास प्रेरणादायी ठरला आहे.



दि. १७ ऑक्टोबर २००८ रोजी शिक्षक सेवेत पदार्पण केलेल्या जेडगुले यांनी सौ. नलिनी सोमनाथ कळसकर प्राथमिक विद्यालयात ५ वर्षे, तर सह्याद्री प्राथमिक विद्या मंदिरात १३ वर्षे अशा एकूण १८ वर्षांच्या सेवेत शैक्षणिक कार्यासोबतच सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरणीय आणि साहित्यिक क्षेत्रातही आपला ठसा उमटविला आहे. च.-., ऊढ.एव., ऊड.च. आणि गेीपरश्रळीा अशी त्यांची शैक्षणिक पात्रता आहे.

'देशाने माझ्यासाठी काय केले यापेक्षा मी देशासाठी काय करणार?' या राष्ट्रनिष्ठ विचाराने प्रेरित होऊन 'मी'पेक्षा 'आम्ही' या भावनेला त्यांनी आपल्या कार्यात प्राधान्य दिले. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या संविधानिक मूल्यांच्या प्रसारासाठी साने गुरुजींच्या विचारांनी प्रेरित राष्ट्र सेवा दलाचा कार्यकर्ता म्हणूनही ते सक्रिय आहेत.

सह्याद्री प्राथमिक विद्या मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी लोकसहभागातून शाळेचे डिजिटल परिवर्तन घडवून आणण्यात त्यांनी मुख्याध्यापक व सहकाऱ्यांसोबत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, त्यांच्यात आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि सामाजिक जाणीव निर्माण व्हावी, यासाठी विविध नाविन्यपूर्ण शैक्षणिक व सहशालेय उपक्रम ते सातत्याने राबवितात.

कोरोना महामारीच्या कठीण काळात ऑनलाइन तासिका, स्वाध्याय, व्ही-स्कूल, दीक्षा प, गृहभेटी अशा विविध माध्यमांतून विद्यार्थ्यांचे शिक्षण अखंडित ठेवण्याबरोबरच 'कोविड योद्धा' म्हणूनही त्यांनी योगदान दिले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शनासोबत भावनिक आधार व समुपदेशन देण्याचे कार्यही त्यांनी संवेदनशीलतेने केले आहे.

पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात सहकारमहर्षी स्व. भाऊसाहेब थोरात यांच्या दंडकारण्य अभियानात सक्रिय सहभाग घेत वृक्षारोपण व पर्यावरण रक्षणाचा संदेश त्यांनी रुजविला. तसेच महाराष्ट्र राज्य मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक-शिक्षकेत्तर महासंघात कोषाध्यक्ष म्हणून संघटनात्मक जबाबदारीही ते पार पाडत आहेत. वाचन, लेखन, वक्तृत्व आणि प्रभावी निवेदन ही जेडगुले यांच्या व्यक्तिमत्त्वाची आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण बाजू आहे. सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विषयांवर लेखन करताना गुणवंत व्यक्ती, शिक्षक, साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या कार्याचा गौरव करण्याची त्यांची लेखणी समाजाशी नाते जोडते. जन्मगाव सायखिंडीच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व पर्यावरणीय विकासासाठीही ते सातत्याने योगदान देत आहेत.

'शिक्षणातून व्यक्तिमत्त्व, संस्कारातून समाज आणि माणुसकीतून राष्ट्र घडविणे' हा जीवनमंत्र जपत कार्यरत असलेल्या संजय जेडगुले यांचा प्रवास हा खऱ्या अर्थाने 'शिक्षक ते समाजशिक्षक' असा आहे. त्यांच्या १८ वर्षांच्या निष्ठावान सेवेला, उपक्रमशीलतेला, सामाजिक बांधिलकीला आणि मानवतावादी दृष्टिकोनाला लोकनेते बाळासाहेब थोरात गुणगौरव 'आदर्श शिक्षक' पुरस्कार २०२६-२७ हा यथोचित सन्मान ठरेल.

**संजय नामदेव आहेर**
**उपसंपादक, दैनिक युवावार्ता**

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25